**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

३६.    हे म्हणणे खरे आहे की, मी हजर केलेला बँक ऑफ इंडियाचा खाते उतारा सन १९७९ ते २०१३ सालचा आहे. सदर खाते उताऱ्यातील नोंदी माझ्या माहितीच्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंदीमध्ये माझ्या खात्यावरुन चेक दिला गेला अशी कुठेही नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खाते उताऱ्यातील व्यवहाराशी रामचंद्र याचा काही संबंध नाही.

प्रश्न – खाते उताऱ्यामध्ये पैसे कोणी काढले याच्या नावाची नोंद नाही ?
(सदर प्रश्नास प्रतिवादी तर्फे वकील श्री.डी.आर. गोरे यांनी असा आक्षेप घेतला की, खाते उताऱ्यामध्ये पैसे काढणाऱ्याचे नाव नमुद केले जात नाही. त्यामुळे प्रश्न संयुक्तीक नाही. सदर आक्षेपास वादी तर्फे वकील श्री. एल.एल. नाथगोसावी असा युक्तीवाद केला की, खाते उताऱ्यावर सेल्फ असा उल्लेख असतो. दोन्ही आक्षेप लक्षात घेता, सदर आक्षेप अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळेस विचारात घेतले जातील.)
उत्तर– उताऱ्यावर नोंद नाही.

३७.    हे म्हणणे खरे आहे की, बँकेच्या लेजर बुकामध्ये पैसे कोणी काढले याची नोंद असते. सन १९७९ ते २०१३ या दरम्यानच्या कालावधीत माझ्या खात्यावरुन पैसे कोणी काढले याची मी बँकेकडून मी नोंद घेतली नव्हती. हे म्हणणे खरे  नाही की, दावा मिळकतीमधील आत्ताचे घर आम्ही सन २००९ साली बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आत्ताच्या घराच्या ठिकाणी पुर्वी कौलारु घर होते. हे म्हणणे खरे आहे की, ते घर कोसळल्यावर नवीन स्लॅबचे घर बांधले. नवीन स्लॅबचे घर सन १९७८ साली बांधले. सन १९७८ साली स्लॅबचे घर बांधल्यावर तशी नोंद ग्रामपंचायत अभिलेख सदरी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये रामचंद्र याचे देखील घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये कौलारु घरइमला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर

घरइमल्याचे दोन ते तीन भाग होते, त्यामध्ये आम्ही भाडेकरु ठेवत असे. हे म्हणणे खरे आहे की, सदर भाडेकरुंचे भाडे मोतिराम जमा करत असे. हे म्हणणे खरे नाही की, मोतिराम ती भाडयाची रक्कम मला पाठवत असे. हे म्हणणे खरे आहे की, मोतिराम सदर भाडयाची रक्कम माझे खाते नं.४२५ यात जमा करत असे. हे म्हणणे खरे नाही की, घरइमला बांधण्या करिता अर्ज मी व मोतिराम याने एकत्रितात दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर कौलारु घरइमला याचे बांधकाम सन १९८० –८१ दरम्यान सुरु करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्या दरम्यान माझे व मोतिराम याचे संबंध चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर कौलारु घरइमला बांधण्या करिता जो काही पैसा लागला तो सर्व खर्च मी केला. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रत्येक वेळेस येणे शक्य नसल्याने मोतिराम याने माझ्याकडून रक्कम घेऊन ती चिरा तसेच इतर कामाच्या लोकांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर रक्कम देण्या करिता खाते नं.४२५ याचा वापर केला गेला. हे म्हणणे खरे नाही की, खाते नं.४२५ याचा हाच उद्देश होता की, मला वारंवार येणे शक्य नसल्याने मोतिराम याने त्यातील रक्कम वेळोवेळी काढून घर बांधण्याच्या खर्चाकरिता वापर करावा.

३८. प्रस्तुत प्रकरणी उभा धोंडा, मशीदीचे भरण येथील मिळकतींशी गणपत याचा संबंध असल्याचे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुत प्रकरणी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, खाते नं.४३१ चा उतारा मी हजर करु शकत नाही. साक्षीदार स्वत: कथन करतो की, खाते नं.४३१ अस्तित्त्वातच नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यावेळेस माझ्या नावे बँकेमध्ये कोणत्या नंबरचे खाते क्रमांक आहे याची मला माहीती होती. हे म्हणणे खरे आहे की, मी अगर रामचंद्र यांनी नारायण विठ्ठल चव्हाण यास धनादेश दिला होता हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अगर रामचंद्र यांनी नारायण यास कोणताही धनादेश दिला नसल्याने त्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. तथाकथित धनादेशाचा नंबर, दिनांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित धनादेश कोणत्या खात्यावरचा होता हे मला सांगता येणार नाही.

३९. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीपैकी अ.क्र.१ व २ या मिळकतीमध्ये आमच्या बहिणींचा देखील हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीपैकी अ.क्र.३ या मिळकतीमध्ये आमच्या बहिणींचा देखील हिस्सा आहे. माझ्या नोटीसीमध्ये, कैफियतीमध्ये तसेच सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नारायण विठ्ठल चव्हाण यास धनादेश दिला असा उल्लेख करण्यास मला काही अडचण नव्हती. माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील परिच्छेद क्र.१५ मधील मजकूर 'सर्वे नं.८५ हि.नं.६, सर्वे नं.७० अ१अ१अ हि.नं.४८ या मिळकती मुळात वादी, प्रतिवादी यांचे वडील कै.गणपत यांच्या वेळेपासून कुटुंबाकडे कुळपणास असलेल्या मिळकती आहेत' या संदर्भातील कूळपणाबाबतचा कागदोपत्री पुराव्याचा शोध महसुल दप्तरी घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व मोतिराम यांचे एकत्र कुटुंब होते हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व मोतिराम यांचे एकत्र कुटुंब होते हे दर्शविणारा कोणताही शासकीय कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की,मी प्रस्तुत प्रकरणी हजर केलेले छायाचित्र बोगस व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर छायाचित्रांशी वादी अगर वादीच्या कुटुंबाचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे, माझ्या भावाचे व आमच्या कुटुंबियाचे मतदान कार्ड, रेशन कार्ड मुंबई येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बघण्यामध्ये मोतिराम याचे एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून लागले होते असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व मोतिराम याचे मौजे शिरगाव येथे एकत्रितात घर आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी व रामचंद्र यांच्या मुलांचे शिक्षण मुंबई येथे झाले. अ.क्र.३ येथील मिळकतीच्या सही शिक्क्याच्या नक्कला मी घेतलेल्या नाहीत. मला सदर खरेदी खताची माहिती सन १९७६ साली प्रथमत: झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी व रामचंद्र याने आमच्या कारकीर्दीत केलेले सर्व व्यवहार लेखी स्वरुपात केले आहेत. दावा मिळकत सोडून मी अन्य मिळकती खरेदी केल्या आहेत. हे म्हणणे
खरे नाही की, त्या मिळकतींचे व्यवहार लेखी केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्व व्यवहार मी तोंडी व रोखीने केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ येथील मिळकतीची बोलणी मोतिराम याने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या व्यवहाराची रक्कम नारायण यास मोतिराम याने पोच केली होती. माझ्या कारकिर्दीत केलेल्या व्यवहारा करिता रक्कम कोठून

तसेच कोणत्या खात्यावरुन काढली याची मला माहीती आहे. मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील परिच्छेद क्र.११ मध्ये नमुद 'नारायण विठ्ठल चव्हाण वगैरे यांच्याशी मुंबई येथे बोलणी करुन' यामधील वगैरे हे चुकीचे आहे. प्रतिज्ञापत्र तयार करते वेळेस वगैरे हा शब्द चुकीचा आहे याची मला माहिती नव्हती.

४०. हे म्हणणे खरे आहे की, नारायण चव्हाण यांचे कुटुंब मोठे होते. माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील परिच्छेद क्र.११ मध्ये नमुद धनादेश कोणाच्या नावाने दिला याचा उल्लेख करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी व रामचंद्र यांनी मोतिराम यास आर्थिक मदत केली असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मी मोतिराम यास पैसे दिले असे दर्शविणारा बँकेकडील कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात हजर करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मोतिराम याला आर्थिक मदत केलेली नसल्यामुळे असा कागदोपत्री पुरावा मी देऊ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत अ.क्र.३ च्या खरेदी व्यवहाराशी माझा व रामचंद्र याचा काही संबंध नसल्याने मला व रामचंद्र याला सदर व्यवहाराबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोतिराम हा त्याच्या हयातीत पोल्ट्री व दुग्धव्यवसाय करत असे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ या मिळकतीची खरेदी एकत्र कुटुंबा करिता करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ ची मिळकत मोतिराम याने एकटयाने स्वउत्पन्नातून खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वडील गणपत मयत झाल्यावर त्यांच्या पश्चात अ.क्र.१ व २ येथील मिळकती आम्हाला मिळाल्या. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ व २ येथील मिळकती वगळल्यास अन्य कोणत्याही वडिलोपार्जित मिळकत नाही. साक्षीदार स्वत: कथन करतो की, कापाची घाटी येथील आणखीन एक वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वडील मयत होण्या पुर्वी मला, रामचंद्र अगर मोतिराम यास वडिलोपार्जित मिळकतीमधून मिळणारे कोणतेही उत्पन्न नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.१२ मधील 'अ.क्र.३ च्या मिळकती भोवती आपल्या खर्चाने दगडी कम्पाऊंड केले, झाडे लावली, विहीर खणली व इलेक्ट्रीक पंप बसवला ' हा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ ची मिळकत खरेदी केल्या पासून त्यामध्ये माझा अगर रामचंद्र याचा कधीही कब्जा नव्हता. हे

म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.१३ मधील मजकूर ' मी व रामचंद्र यांनी मधुकर यास अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये पोल्ट्री बांधण्यास संमती दिली' हा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोल्ट्रीचे क्षेत्र सोडून इतर क्षेत्राशी देखील मधुकर याचा हक्क संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ ची मिळकती नोकरीच्या उत्पन्नातून खरेदी घेतल्याचे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, उभा धोंडा, मशीदीचे भरड येथील मिळकतीमध्ये झाडे, माड, फणस यांची लागवड तसचे विहीर खोदाई एकत्र कुटुंबाने केली असल्याचे माझे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुत प्रकरणी हजर केलेली लग्नपत्रिका, शिधा पत्रिका, पासबुक, छायाचित्रे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी विरोधात बांधकामावरुन ग्रामपंचायतीमध्ये दिलेल्या तक्रारी खोटया आहेत. हे म्हणणे खरे  नाही की, ग्रामपंचायतीने मधुकर याच्यावर कोणताही कारवाई केली नाही. साक्षीदार स्वत: कथन करतो की, ग्रामपंचायतीने मधुकर यास समज दिली. हे म्हणणे खरे  आहे की, ग्रामपंचायतीने मधुकर याच्यावर कोणतीही कारवाई केली हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात हजर करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणी हजर केलेले विद्युत बिल कोणत्या घराचे आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत बिलावर कोणत्याही घराचा क्रमांक नमुद नाही.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब......**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.१०/०२/२०२६